ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १०    पुणें, बुधवार तारीख १९ मे, १९५४    अंक १०

## विविध माहिती

**नव्या विमानांची खरेदी**—एअर इंडिआ इंटर नॅशनलनें ५ सुपर कॉन्स्टेलेशन विमानें अमेरिकेकडून मागविलीं होतीं. त्यापैकीं पहिलें विमान नुकतेंच लंडनला आलें आहे. हें मोठें विमान कांहीं साहित्य बसविण्यासाठीं प्रथम ॲमस्टरडॅमला जाईल व तेथून हा महिना संपण्यापूर्वी भारतांत येऊन दाखल होईल. ह्याच जातीचें दुसरेंहि एक विमान कांहीं आठवड्यांत भारतांत येईल.

**नेपाळमध्यें विजेसाठीं धरण**—नेपाळमध्यें त्रिशुली ह्या ठिकाणीं वीज निर्माण करण्यासाठीं धरण बांधण्यांत येणार आहे. ह्या योजनेसाठीं मदत म्हणून भारत सरकारनें ३ कोटी रुपये देण्याचें कबूल केलें आहे. नेपाळ व भारत ह्यांच्या दरम्यान हवाई वहातुकीचा करारहि करण्यांत येणार आहे. नेपाळमध्यें सध्या पांच विमानतळ असून सहावा लवकरच बांधून पुरा होईल.

**निर्वासित व्यापाऱ्यांना दिलेलीं कर्जें**—भारतीय सरकारनें पंजाबमधील निर्वासित विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून २५ लाख रुपयांचीं कर्जें दिलीं होतीं. हीं कर्जें रद्द करण्याचें आतां सरकारनें ठरविलें आहे. कर्जाऊ दिलेल्या रकमेपैकीं ५,००,००० रुपयांची वसुली सरकारनें केलेली आहे. पंजाब सरकारनें विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षांत घेऊन कर्जें रद्द करण्याची विनंती भारतीय सरकारला केली होती.

**काळ्या हस्तिदंतांचें प्रदर्शन**— रंगून येथें लवकरच भरणाऱ्या बुद्धधर्मीयांच्या ६ व्या परिषदेंत शिसवीच्या लांकडाइतक्या काळ्या रंगाचे असलेले हत्तीचे दोन दांत प्रदर्शनासाठीं मांडण्यांत येणार आहेत. हे दांत ६ फूट लांब, १॥ फूट रुंद आणि वजनानें ११० पौंड आहेत.

**केवळ सोयीसाठीं लग्नें**—डॅनिश सरकारी नोकरांत सध्या सोयीसाठीं तात्पुरतीं लग्नें करण्याची चळवळ फैलावली असून अधिकाधिक सरकारी नोकर तींत सामील होऊं लागले आहेत. लग्न केलेल्या आणि नंतर घटस्फोट घेतलेल्या नोकरांना अविवाहित नोकरांपेक्षा दरमहा ५ पौंड अधिक देण्याच्या सरकारी धोरणा-विरुद्ध निषेध प्रदर्शित करण्यासाठीं ही चळवळ करण्यांत आली आहे. कांहीं तरुण-तरुणी जूनमध्यें सामुदायिकरीत्या लग्नें करून नंतर लवकरच लवकर घटस्फोट घेणार आहेत.

**विजेचे कारखाने ताब्यांत घेण्याचा कायदा**—मद्रास विधिमंडळानें राज्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीचे अगर खाजगी मालकीचे विजेचे कारखाने नुकसान-भरपाई देऊन ताब्यांत घेण्याचा कायदा मंजूर केला आहे. १९४९ सालीं मंजूर झालेल्या पण सुप्रीम कोर्टानें रद्द ठरविलेल्या कायद्या-सारखाच हा कायदा पुन्हा करण्यांत आला आहे.

**कृत्रिम पेट्रोलचें उत्पादन**—कृत्रिम पेट्रोल उत्पादन करणें कितपत शक्य आहे हें अजमावून पहाण्यासाठीं भारतीय सरकारनें एक समिति नेमली होती. कृत्रिम पेट्रोलचें उत्पादन करण्यासाठीं खर्च फार येतो आणि परकीय मदतहि घ्यावी लागते म्हणून ही योजना अंमलांत आणावयाची नाहीं, असा निर्णय घेण्यांत आला. सध्याच्या आर्थिक टंचाईचाहि निर्णयावर परिणाम झाला.

**भारताची पोलंडला देणगी**—भारतीय सरकारनें पोलंडच्या सरकारला २१ हिंदी तैलचित्रें देणगी म्हणून दिलीं होतीं. हीं तैलचित्रें पोलंडच्या सरकारला अधिकृतपणें देण्याचा समारंभ भारताचे पोलंडमधील वकील श्री. के. पी. एस्. मेनन ह्यांच्या हस्तें नुकताच पार पडला.

**सर जॉन हंट मॉस्कोला जाणार**—हिमालयाच्या गौरीशंकर शिखरावर प्रथमच आरोहण करणाऱ्या तुकडीचे नेते, सर जॉन हंट, जून महिन्यांत मास्कोला जाणार आहेत. रशिअन गिर्यारोहक आणि मुत्सद्दी ह्यांच्यासमोर गिर्यारोहणासंबंधीं त्यांचीं व्याख्यानें होणार आहेत. सर जॉन हंट ह्यांची रशिआची भेट ब्रिटिश परराष्ट्रखात्यातर्फे ठरविण्यांत आली आहे.

**पं. नेहरूंचें चरित्र**—अमेरिकेंतील मॅकमिलन नांवाच्या प्रकाशकानें पं नेहरूंचें चरित्र पुढील फेब्रुआरींत प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. 'टाइम्स ऑफ इंडिआ' चे संपादक मि. फ्रँक मोरेस हे चरित्र लिहिणार असून तें अमेरिका, ब्रिटन आणि भारत ह्या सर्व देशांत एकाच वेळीं प्रसिद्ध होणार आहे. पं. नेहरूंचें हें पहिलेंच मोठें चरित्र होईल. त्यांनीं आपलें आत्मचरित्र १९३४ सालीं प्रसिद्ध केलेलें आहे

**सीलोनमध्यें भारतीय व्यापारी प्रदर्शन**—पुढील महिन्याच्या मध्याच्या सुमारास कोलंबो येथें भारतीय मालाचें एक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत टिकाऊ अन्नपदार्थ व पेयें, प्लॅस्टिकचें सामान व खेळणीं, कातड्याचें सामान, सौंदर्य-प्रसाधनें, विजेचीं उपकरणीं, औषधें आणि शस्त्रक्रियेचीं हत्यारें, इत्यादि अनेक प्रकारचा माल मांडण्यांत येणार आहे.

**दावणगिरी येथें नवीन विमानतळ**—म्हैसूर राज्यांतील दावणगिरी शहराच्या जवळ नवीन विमानतळ बांधण्यांत आला असल्याचें समजतें. विमानतळ सहा एकर जागेवर बांधण्यांत आला असून त्यासाठीं म्हैसूर सरकारला १३,००० रुपये खर्च आला. ह्या विमानतळावरून विमानांत बसण्याची हौस असणारांचीच फक्त सोय होईल पण पुरेशी माणसें जमल्यास विमान-क्लबहि स्थापन करण्याचा सरकारचा विचार आहे.

## श्वासोश्वास अशक्य असलेल्या वातावरणांतील श्वसन

( Breathing in Irrespirable Atmospheres. लेखक: रॉबर्ट डेव्हिस, के. टी., एफ. आर. एस. ए., प्रस्तावना: प्रोफेसर सर लिओनार्ड हिल, एफ. आर. एस., एलएल. डी., एम्. बी. पृ. सं. ३८६ किं. २५ रु. )

अपायकारक किंवा घातक वातावरणांतील श्वासोश्वासाच्या अडचणी व त्यांचें निवारण, ह्या विषयावरील अधिकारी तज्ज्ञांनीं लिहिलेला हा ग्रंथ आहे. पाण्याखाली, जमिनीवर किंवा हवेंत श्वास घेतां यावा ह्यासाठीं केवळ तात्विक अभ्यास नव्हे तर व्यावहारिक सामुग्रीची योजना तयार करण्यांत सर रॉबर्ट डेव्हिस ह्यांनीं सबंद आयुष्य खर्च केलें आहे. त्यांच्या दूरदर्शीपणामुळेंच सिबे गॉर्मन आणि कं. लि. मध्ये संशोधन व प्रयोग ह्यांच्या योजनेस महत्त्वाचें स्थान मिळालें व श्वासोश्वासाच्या आधुनिक सामुग्रीच्या उत्पादनास आवश्यक असें महत्त्वाचें संशोधन व प्रयोग येथें करण्यांत येत असतात. ह्या विषयावरील उपलब्ध ऐतिहासिक माहिती, श्वासोश्वासाची क्रिया, उंच ठिकाणचा श्वासोश्वास, बंद पडलेला श्वास सुरू होणें, श्वासोश्वासाच्या सामुग्रीची उत्क्रांति, गॅस मास्क प्रभृति साधनें, इत्यादींचें शास्त्रीय विवेचन ह्या ग्रंथांत दिलें असून आकृत्या आणि चित्रें ह्यांच्या साह्यानें विवेचन सुबोध करण्यांत आलें आहे.

सर रॉबर्ट डेव्हिस हे सिबे गॉर्मन आणि कं. लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर असून, त्यांच्या कंपनीला गेलीं ४० वर्षें सर लिओनार्ड हिल ह्यांच्या सल्ल्याचा लाभ होत आहे. डॉ. लिओनर्ड लेव्ही, एम. ए. ( कॅं. ) डी. एससी., एफ. आय. सी., एफ. सी. एस., हेहि कंपनीचे सल्लागार आहेत. त्यांच्याप्रमाणेंच खि. वा. प्रोफेसर जॉन हाल्डेन, एफ. आर. एस. व त्यांचे चिरंजीव प्रोफेसर जे. बी. एस. हाल्डेन, एफ. आर. एस. ह्यांच्या सल्ल्याचाहि कंपनीला फायदा मिळत आहे. शास्त्रज्ञ व त्यांचें संशोधन ह्यांच्या व्यावहारिक उपयुक्ततेचें हें निदर्शक आहे. दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं असंख्य इंग्रज नागरिकांचा बचाव करण्याचें श्रेय संशोधक व उद्योगपती ह्यांच्या प्रभावी सहकार्यास आहे.

---

### शेतीचे हिशेब ठेवणारांना बक्षिसें

शास्त्रोक्त पद्धतीनें शेतीचे हिशेब ठेवण्याच्या बाबतींत शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठीं, मुंबई सरकारनें १९५४–५५ सालीं शेतीचे हिशेब ठेवणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षिसें देण्याचें ठरविलें आहे. ही स्पर्धा गुजराथ, दख्खन आणि कर्नाटक या तीन विभागांत घेण्यांत येईल. स्पर्धेसाठीं शेतकऱ्यांचे पुढील प्रमाणें दोन गट करण्यांत येतील. ( १ ) शेतीसाठीं आलेला खर्च व लावलेल्या पिकापासून मिळालेलें उत्पन्न याबाबतची बिनचूक व प्रामाणिकपणें माहिती पुरविणारे व ( २ ) वरील प्रकारच्या माहितीशिवाय आणखी शेतावर केलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या कामांची तपशिलवार माहिती पुरविणारे. प्रत्येक विभागांत ३०० रु., २०० रु. १०० रु. व अशी तीन बक्षिसें ठेवण्यांत आलीं असून तीं प्रत्येक गटांतील शेतकऱ्यांना गुणानुक्रमानें देण्यांत येतील.


## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ७७२ / तारेचा पत्ता : फार्मर्सबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० |
| | रु. ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,७०,२७,००० |

१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १६ मे, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रॅशनलायझेशन

रॅशनलायझेशन हा शब्द आतां वरचेवर वापरण्यांत येऊं लागला आहे. त्या शब्दाचा ऑक्सफर्ड शब्दकोशांतील अर्थ "उत्पादन व खप ह्यांचा मेळ घालून आणि प्रतिस्पर्धी उद्योगांचें, भांडवलाचें व कामगारांचें सहकार्य घडवून आणून उद्योगधंदा सुधारणें" असा आहे. ह्या अर्थाकडे कोणीच लक्ष देत नाहीं; यंत्रसामुग्रीचा वापर वाढवून तिला मानवी श्रमाची जागा देणें एवढाच अर्थ प्रत्येकाच्या मनांत येतो. यंत्रसामुग्रीचा अधिकांत अधिक उपयोग केल्यानें इतर कारखानदारांशीं यशस्वी रीतीनें स्पर्धा करतां येते, म्हणून मालकवर्ग रॅशनलायझेशनचा पुरस्कार करतो; उलटपक्षीं बेकारीच्या भीतीनें कामगारवर्ग त्यास विरोध करतो, अशी येथें परिस्थिति आढळते.

प्लॅनिंग कमिशनच्या पुरस्कारानें दिल्ली येथें कपास कापडाच्या धंद्यासंबंधीं रॅशनलायझेशनचा विचार करण्यासाठी गेल्या महिन्यांत एक बैठक भरविण्यांत आली होती. अहमदाबाद मॅन्युफॅक्चरिंग अँड कॅलिको प्रिंटिंग कंपनीनें ॲटोमॅटिक माग बसविण्याची परवानगी मागितली, त्यानें ह्या प्रश्नास विशेष चालना मिळाली. रॅशनलायझेशनच्या प्रश्नाच्या दोन बाजू आहेत. "यांत्रिकीकरणाची गति फार मोठी असणार नाहीं, त्यामुळें बेकारी वाढण्याची तातडीची भीति नाहीं. रॅशनलायझेशनचा फायदा गिऱ्हाइकांना मिळणार आहे व कांहीं थोड्या कामगारांसाठीं बहुसंख्य लोकांचें नुकसान होणें समर्थनीय नाहीं. कापडाची निर्गत वाढवावयाची असेल, तर रॅशनलायझेशन अपरिहार्य आहे" असें त्याचें समर्थन करण्यांत येत आहे. ह्याच्या उलट युक्तिवाद असा, कीं मालकांच्या नफ्यांत घट होण्यास जोपर्यंत भरपूर वाव आहे, तोपर्यंत मालक-कामगारांच्या वेतनाचें प्रमाण बदलण्याचें कारण नाहीं; म्हणून रॅशनलायझेशन तहकूब ठेवावें. आणखी गोष्ट अशी कीं, कांहीं कारखान्यांना रॅशनलायझेशनची परवानगी द्यावयाची व कांहींना नाकारावयाची, असें करतां येणार नाहीं. म्हणून, त्या संबंधांतील धोरण सर्वांना एकजात लागू होईल, असेंच आंखलें पाहिजे.

उद्योगधंद्यांच्या रॅशनलायझेशनचा प्रश्न हा आतां तात्त्विक चर्चेचा विषय राहिलेला नाहीं. कारखान्यांचें यांत्रिकीकरण व आधुनिकीकरण हें एकसारखें चालूच आहे. नवीं यंत्रें बसविण्यांत येत असतात व कामगारांच्या रिकाम्या जागा भरण्यांत येत नाहींत. त्यामुळें भांडवल-कामगार प्रमाणांत बदल घडून येत आहे. प्रश्न एवढाच आहे कीं हा बदल जाणून बुजून, धोरण आखून घडवून आणावयाचा, का गैरशिस्तपणें तो येऊं द्यावयाचा. कानपूरमधील सात कापड गिरण्यांनीं रॅशनलायझेशनच्या योजना तयार केल्या आहेत आणि ज्यांना शक्य आहे त्या गिरण्या त्यांचें अनुकरण करूं लागणें क्रमप्राप्त आहे.

कापड गिरण्यांतील मागांपुरता विचार केला तर त्या विभागांतील बरेच कामगार रॅशनलायझेशनमुळें बेकार होतील. कामगारांचें वेतन उत्पादनाशीं प्रमाणबद्ध ठेवावयाचें असेल आणि भांडवलाची उत्पादनक्षमता कामगारापेक्षा जास्त असेल, तर रॅशनलायझेशन हाच उद्योगधंद्यांच्या वाढीचा एकमेव मार्ग आहे, असें अर्थमंत्र्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. त्याखेरीज, नवे उद्योगधंदे काढण्यास भांडवलदार पुढें येणारच नाहींत. हातमागावर कापड काढणाऱ्या विणकरांची संख्या प्रचंड असली, तरी त्यांचें दुखणें वेशीवर टांगणारी प्रभावी संघटना आज अस्तित्वांत नाहीं. उलट, गिरणी कामगारांचे पुढारी अत्यंत जागरूक व उत्कृष्ट प्रचारक आहेत आणि बेकारीच्या भीतीचें चित्र ज्या मानानें भयानक दिसेल, त्या मानानें रॅशनलायझेशनच्या फायद्यांचें चित्र उठावदार दिसणारच नाहीं.

भारतांतील उत्पादनाच्या भांडवल व कामगार ह्या दोन घटकांपैकीं कोणत्या घटकास प्राधान्य द्यावयाचें हा महत्त्वाचा प्रश्न येथें उपस्थित होतो. आपल्या देशांत जोपर्यंत कोट्यवधि लोक बेकार किंवा अपुऱ्या कामावर आहेत, तोपर्यंत यंत्रसामुग्री वाढवून बेकारींत भर घालणें देशाच्या हिताचें होणार नाहीं, असें म्हटलें जातें. परंतु काम करणाऱ्या मनुष्याचें पोट भरेल इतकी मजुरी सुटण्याइतकें काम तरी त्याच्या हातून यंत्रसामुग्रीच्या अभावीं होऊं शकेल काय, ह्याचें उत्तर स्पष्ट आहे. परदेशांतील यांत्रिक उत्पादनापुढें साध्या हातानें तयार केलेल्या मालाचा टिकाव कसा लागणार? ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून कसें भागणार? माणसाच्या हातांना यंत्रांची जोड ग्रामोद्योगांतहि दिली जात आहे; मग कारखान्यांत त्याच पद्धतीचें अंतिम स्वरूप अवलंबिलें जाणें अपरिहार्य नाहीं काय? रॅशनलायझेशनच्या प्रश्नानें कालांतरानें आर्थिक व राजकीय खळबळ उडवून दिली, तर तें आश्चर्यकारक ठरणार नाहीं.

---

## दडविलेल्या उत्पन्नाला दाखविलेला उजेड

इनकमटॅक्स इन्व्हेस्टिगेशन कमिशनची १९४७ मध्यें नेमणूक झाली, तेव्हांपासून ३१ डिसेंबर १९५३ अखेर त्याचेकडे लपविलेल्या उत्पन्नाची १,६६८ प्रकरणें चौकशीसाठी सोपविण्यांत आलीं. त्यांपैकीं १,०३१ प्रकरणें निकालांत निघालीं असून त्यांत ४५,९७,०४,५०० रु. लपविलेलें उत्पन्न उजेडांत आलें आहे. आपण होऊन प्रकट केलेल्या उत्पन्नांची रक्कम त्यांत समाविष्ट नाहीं.

| वर्षअखेर (डिसेंबर) | निकालांत काढलेलीं प्रकरणें | उजेडांत आणलेलें गुप्त उत्पन्न रु. |
|---|---|---|
| १९४८ | ४ | ३,७७,२७७ |
| १९४९ | १०१ | २,८८,०६,५०७ |
| १९५० | २३२ | ८,११,४२,९८५ |
| १९५१ | ३२० | १८,१२,२६,९७५ |
| १९५२ | २०६ | १०,८८,६२,७५८ |
| १९५३ | १६८ | ५,९२,८७,९९८ |
| एकूण | १,०३१ | ४५,९७,०४,५०० |

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA.

***Balance Sheet as at 31st December, 1953.***

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital :—** | | |
| 10,000 shares of Rs. 100 each ... | | 10,00,000—0—0 |
| **Issued Capital :—** | | |
| 10,000 shares of Rs. 100/- each ... | | 10,00,000—0—0 |
| **Subscribed and Paid-up Capital :—** | | |
| 10,000 shares of Rs. 100 each, Rs. 75 per share called up | 7,50,000—0—0 | |
| Less— 336 Shares forfeited ... | 25,200—0—0 | |
| 9,664 | 7,24,800—0—0 | |
| Less—Calls unpaid ... | 10,075—0—0 | |
| | 7,14,725—0—0 | |
| Add Forfeited shares ... | 12,310—0—0 | 7,27,035—0—0 |
| **1A Calls in Advance** ... | | 24,375—0—0 |
| **2. Reserve Fund & Other Reserves** ... | | 2,29,859-11—9 |
| **3. Deposits & Other Accounts :—** | | |
| Fixed Deposits ... | 26,91,472—8—0 | |
| Savings Bank deposits ... | 16,99,566—0—8 | |
| Current accounts, Contingency Accounts etc. ... | 21,72,449-11—7 | 65,63,488—4—3 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| ( i ) In India ... | 0—0—0 | |
| ( ii ) Outside India ... | 0—0—0 | |
| **Particulars :** | | |
| ( i ) Secured-by ... | 0—0—0 | |
| ( ii ) Unsecured ... | 0—0—0 | 0—0—0 |
| **5. Bills Payable** ... | | 25,979—1—3 |
| **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra :** | | |
| ( i ) Payable in India ... | 1,14,818—7—3 | |
| ( ii ) Payable outside India ... | 0—0—0 | 1,14,818—7—3 |
| **7. Other Liabilities** ... | | 62,434—5—6 |
| **8. Acceptances, Endorsements & Other Obligations per Contra :** | | 0—0—0 |
| **9. Profit and Loss :—** | | |
| Profit as per last Balance Sheet ... | 73,546—1—7 | |
| Less–appropriations :— | | |
| ( i ) Reserve Fund Rs. 19,000-0-0 | | |
| ( ii ) Provision for Income-tax and Corporation tax Rs. 20,000-0-0 | | |
| ( iii ) Reserve for Investments Rs. 19,000-0-0 | | |
| ( iv ) Reserve for Bad and Doubtful Debts Rs. 15,000-0-0 | 73,000—0—0 | |
| | 546—1—7 | |
| Add : profit for the year brought from the Profit and Loss Account ... | 96,732-10-11 | 97,278-12—6 |
| Total Rs. ... | | 78,45,268-10—6 |

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA.

***Balance Sheet as at 31st December, 1953.***

## PROPERTY AND ASSETS

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank ... | | 10,79,460–13–6 |
| **2. Balances with other Banks ( In current account ):—** | | |
| ( i ) In India ... | 80,065–6–11 | |
| ( ii ) Outside India ... | 0–0–0 | 80,065–6–11 |
| **3. Money at Call and Short Notice** ... | | 0–0–0 |
| **4. Investments at Cost** | | 28,94,268–0–0 |
| ( i ) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments. ... ( Average Market Value: Rs. 26,22,634-13-0 ) | 28,27,718–0–0 | |
| ( ii ) Shares: Ordinary shares fully paid-up ... ( Realisable value Rs. 66,550/- ) | 66,550–0–0 | |
| ( iii ) Debentures or Bonds ... | 0–0–0 | |
| ( iv ) Other investments ... | 0–0–0 | |
| ( v ) Gold ... | 0–0–0 | |
| ( Investment which have no Market quotations have been shown at their Realisable value ) | 28,94,268–0–0 | |
| **5. Advances** ... ( Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors ) Particulars as per Schedule. | | 35,15,587–9–1 |
| ( i ) Loans: Cash-credits, Over-drafts etc. | | |
| (1) In India ... | 34,96,590–15–1 | |
| (2) Outside India ... | 0–0–0 | |
| | 34,96,590–15–1 | |
| ( ii ) Bills Discounted and Purchased (Excluding Treasury Bills of the Central and State Governments ) | | |
| (1) Payable in India ... | 18,996–10–0 | |
| (2) Payable outside India ... | 0–0–0 | |
| | 35,15,587–9–1 | |
| **6. Bills Receivable being Bills for Collection as per contra :** | | |
| ( i ) Payable in India ... | 1,14,818–7–3 | |
| ( ii ) Payable outside India ... | 0–0–0 | 1,14,818–7–3 |
| **7. Constituents' Liabilities For Acceptances, Endorsements and Other Obligations, per contra :** ... | | 0–0–0 |
| **8. Premises :—** | | |
| Cost as per last Balance Sheet ... | 25,013–14–0 | |
| Less : Total depreciation written off ... | 6,438–14–0 | 18,575–0–0 |
| **9. Furniture and Fixtures :—** | | |
| Cost as per last Balance Sheet ... | 38,203–7–0 | |
| Additions during the year ... | 2,194–4–0 | |
| | 40,397–11–0 | |
| Less : Sales during the year ... | 0–0–0 | |
| | 40,397–11–0 | |
| Less : Total depreciation written off ... | 14,026–11–0 | 26,371–0–0 |
| **10. Other Assets, Including Silver :—** | | 1,16,122–5–9 |
| ( 1 ) Interest accrued on Investments ... | 31,812–11–0 | |
| ( 2 ) Printing and Stationery on hand ... | 21,625–0–0 | |
| ( 3 ) Deposit with Electric and Telephone Companies ... | 2,178–0–0 | |
| ( 4 ) Income Tax paid in advance and at source ... | 35,036–2–9 | |
| ( 5 ) Legal Expenses recoverable ... | 1,050–0–0 | |
| ( 6 ) Advance payment for purchase of Property at 1217 Shivaji Nagar, Poona 5 ... | 6,900–0–0 | |
| ( 7 ) Stamps on hand ... | 341–4–0 | |
| ( 8 ) Cheques and Drafts for collection ... | 1,628–13–6 | |
| ( 9 ) Insurance Premium paid in advance ... | 60–0–0 | |
| (10) Balances in c/a with Co-op. Banks ... | 15,490–6–6 | |
| | 1,16,122–5–9 | |
| **11. Non-Banking Assets Acquired In Satisfaction Of Claims** | | 0–0–0 |
| **12. Profit and Loss** ... | | 0–0–0 |
| Total Rs. ... | | 78,45,268–10–6 |

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA.

## *SCHEDULE*

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1953**

| Particulars | Loans, Advances, Cash Credits & Overdrafts | Bills Discounted & Purchased |
|---|---|---|
| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
| 1. Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 21,53,304-12-6 | 15,971—8—0 |
| 2. Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security | 12,90,597—0—6 | ... |
| 3. Debts considered good secured by the personal liabilites of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 52,689—2—1 | 3,025—2—0 |
| 4. Debts considered doubtful or bad not provided for ... | ... | ... |
| Total Rs. ... | 34,96,590-15—1 | 18,996-10—0 |
| 5. Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | ... | ... |
| 6. Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 90,514-14—5 | ... |
| 7. Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointty with any other persons ... | ... | ... |
| 8. Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 1,30,650—2—1 | ... |
| 9. Due from Banking Companies ... | ... | ... |

### *Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1953*

| EXPENDITURE | Rs. As.Ps. | INCOME | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on Deposits, and Borrowings, etc. ... | 1,33,653—7—5 | (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary Provisions) | |
| 2. Salaries and Allowances and Provident Fund (including Salary and Allowances to Managing Director Rs. 10,200) ... | 88,254—6—8 | 1. Interest and Discount ... | 3,36,402—2—6 |
| | | 2. Commission, Exchange & Brokerage | 8,719-15—6 |
| | | 3. Rent ... | 360—0—0 |
| 3. Directors' & Local Committee members' fees & allowances ... | 1,617—8—0 | 4. Net Profit on sale of Investments, Gold, Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserves or any particular Fund or Account) ... | 0—0—0 |
| 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | 4,826-14—9 | | |
| 5. Law Charges ... | 0—0—0 | | |
| 6. Postage, Telegrams and Stamps | 1,694-10—9 | 5. Net Profit on Revaluation of Investments, Gold & Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserves or any particular Fund or Account) ... | 0—0—0 |
| 7. Auditor's Fees ... | 1,200—0—0 | | |
| 8. Depreciation on and Repairs to Banking Company's Property ... | 2,312—8—0 | | |
| 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 8,171—6—6 | 6. Income from Non-Banking Assets and Profit from Sale of or dealing with such Assets ... | 1,411—3—6 |
| 10. Loss from Sale of or dealing with Non-Banking Assets ... | 0—0—0 | | |
| 11. Other expenditure: | 8,429-12—6 | 7. Loss if any ... | 0—0—0 |
| 12. Banlance of Profit ... | 96,732-10-11 | | |
| Total Rs. ... | 3,46,893—5—6 | Total Rs. ... | 3,46,893—5—6 |

C. G. Joshi, *Accountant.* G. D. Joglekar, *Manager.* C. T. Chitale, *Managing Director.* G. R. Sathe, *Chairman.* D. G. Bapat, *Vice-Chairman.*

S. M. Joshi, W. P. Vaidya, L. M. Joshi,
L. R. Dhadphale, G. U. Chitale, M. M. Gadre, S. G. Keni } *Directors*

## AUDITOR'S REPORT TO THE SHARE-HOLDERS

We have audited the foregoing Balance Sheet of the Presidency Industrial Bank Ltd., as at the 31st day of December 1953, and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date in which is incorporated the audited return of Bombay Branch and report that :—

(1) We have obtained all the information and explanations we have required and have found them to be satisfactoy.

(2) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank.

(3) In our opinion, the foregoing Balance Sheet and Profit and Loss Account are drawn in conformity with the Law.

(4) Such Profit and Loss Account, shows a true Balance of Profit for the year.

(5) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the affairs of the Bank according to the best of our information and explanations given to us and as shown by the books of the Bank, and

(6) In our opinion, books of account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act, 1913.

POONA CITY, }
25th March 1954. }

B. C. ABHYANKAR & Co.
*Chartered Accountants.*

## कलकत्ता विद्यापीठाला देणगी

कलकत्ता शहराची आर्थिक व सामाजिक पहाणी करण्यासाठी म्हणून भारताच्या नियोजन समितीनें कलकत्ता विद्यापीठाला ३,७८,००० रुपयांची मदत दिली आहे. कलकत्ता विद्यापीठाच्या अर्थशास्त्र खात्याचे प्रमुख डॉ. जे. पी. नियोगी ह्यांच्या देखरेखीखाली पहाणीचा अहवाल तयार करण्यांत येणार आहे. शहरांतील ५,००० कुटुंबांचा 'नमुन्याचीं कुटुंबें' म्हणून वरील पहाणींत समावेश करण्यांत येणार असून हें कार्य जवळजवळ ५ वर्षेपर्यंत चालेल असा अंदाज आहे. तथापि, अहवाल करण्याच्या पद्धतीसंबंधी नियोजन समितीनें दिशा दाखवून दिली आहे. अहवाल एकदम न करतां टप्प्यानें करावा अशी सूचना करण्यांत आली आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाची मुदत सरण्याच्या सुमारास कांहींतरी निर्णय बाहेर पडावा अशी नियोजन समितीची इच्छा असल्यानें वरील सूचना करण्यांत आली असल्याचें समजतें. कलकत्त्याची लोकसंख्या कोणत्या कारणानें झपाट्यानें वाढली आणि ती कशा क्रमानें वाढली ह्याविषयीं संशोधन करण्याचा उद्देश पुढें ठेवण्यांत आला आहे. कलकत्ता हें भारतामधील सर्वांत दाट वस्तीचें शहर आहे हें प्रसिद्धच आहे. कलकत्त्यांत लोकांची गर्दी होण्याचीं कारणें, त्या गर्दीची मर्यादा, लोकांना दुसरीकडे हलविण्याची शक्यता, लोकांच्या रोजगारीचे प्रकार, इत्यादी-विषयासंबंधींहि पहाणी करण्यांत येणार आहे. कलकत्त्यांत बाहेरून आलेल्या स्थलांतरितांचे पूर्वीचे व्यवसाय काय होते आणि कलकत्त्यामधील कांहीं विशिष्ट भागच त्यांनीं वस्तीसाठी का निवडले ह्यासंबंधींहि अभ्यास करण्यांत येणार आहे. लोक-संख्येच्या केंद्रीकरणासंबंधी करण्यांत येणारी ही पहाणी अनेक दृष्टींनीं महत्त्वाची ठरेल असें वाटतें.

## आसाममधील हत्तींच्या व्यापारांत मंदी

हत्तींच्या किंमतींत फार घट झाल्यामुळें आसाममधील हत्तींचे व्यापारी मोठ्या आर्थिक अडचणींत सांपडले आहेत. पूर्वी ज्या हत्तींची किंमत निदान ३,००० रुपये तरी येत असे त्याच हत्तीला आतां १,००० ते १,२०० पर्यंतच किंमत येते. आसामांत हत्तींना पकडण्याचे परवाने असलेले १०–१२ परवानेदार आहेत. चालू सालीं वयांत आलेले सुमारें ३०० हत्ती पकडण्यांत येतील असा त्यांचा अंदाज होता. पण बाजारपेठेंतील मंदीची भावना लक्षांत घेऊन अवघे २०० हत्तीच पकडण्यांत आले. हत्तींच्या बाजारांतील किंमती घसरण्याचीं कारणें सांगतांना जंगल खात्याचा एक अधिकारी म्हणाला कीं भारतामधील देशी संस्थानें हीं हत्ती खरेदी करणारीं मोठीं गिऱ्हाइकें होतीं. आतां ही सर्व संस्थानें विलीन झाल्या कारणानें गिऱ्हाईक मोठ्या प्रमाणावर कमी झालें आहे. बिहार, ओरिसा आणि उत्तर प्रदेश येथील वरिष्ठ मध्यमवर्ग अजूनहि हत्ती घेतो. परंतु संस्थानांना हत्ती घेण्यासाठी ज्या किंमती परवडत असत तितक्या देण्याला तो तयार नाहीं. भारताची फाळणी झाल्यामुळेंहि ह्या व्यापाराला बराच धक्का बसला आहे. शिवाय 'खेडा' पद्धतीनें हत्ती पकडण्याची पद्धत ही फार महागांत पडते. वयांत आलेल्या प्रत्येक हत्तीमागें सरकार ७६० रुपये रॉयल्टी घेते, लहान हत्तीसाठी ६०० रुपये रॉयल्टी आणि हत्तीच्या मादीसाठी ७०० रुपये रॉयल्टी द्यावी लागते. त्यामुळें हत्तींच्या किंमती अधिकच वाढतात. खुद्द आसाम राज्य सरकार हत्तींचा उपयोग निरनिराळ्या कामासाठीं करून घेते. हत्तीकडून कामें करून घेण्यासाठी म्हणून राज्य सरकारनें सुमारें २४ हत्ती आपले 'नोकर' म्हणूनच ठेवल्यासारखे आहेत.

## बँक निवाड्याच्या विचारासाठी तीन महिन्यांची मुदतवाढ

बँक तंट्यांतील लेबर अपील न्यायालयाच्या निवाड्याचा विचार करून निर्णय जाहीर करण्याची मुदत तीन महिन्यांनीं वाढविण्याबाबत एक वटहुकूम भारत सरकार काढणार आहे. तोंपर्यंत बँकनोकरांचे पगार व इतर शर्ती याबाबत सध्या जी स्थिति आहे तींत कांहीं फरक होणार नाहीं. कायद्यानें दिलेली ३० दिवसांची मुदत सर्वस्वी अपुरी आहे म्हणून वटहुकमानें मुदतवाढ करण्यांत येत आहे असें सरकारी प्रेसनोटनें जाहीर केलें आहे.

## ट्रेझरी ऑफिसांचें बँक पे ऑफिसांत रूपांतर

एस्टिमेट्स कमिटीचा अहवाल लोकसभेस गेल्या आठवड्यांत सादर करण्यांत आला. सध्याची ट्रेझऱ्यांची पद्धत जुनीपुराणी झाली असून त्यांचें काम बँक कचेऱ्यांमार्फत करविण्यांत यावें असें कमिटीनें सुचविलें आहे. जेथें इंपीरिअल बँकेची शाखा नसेल तेथें तें काम रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानें दुसऱ्या एखाद्या शेड्यूल्ड बँक कचेरीस यावें. तेंहि शक्य झालें नाहीं, तर ट्रेझरी ऑफिसचें रूपांतर इंपीरिअल बँकेच्या पे ऑफिसमध्यें करण्यांत यावें. इंपीरिअल बँक त्वरित सरकारच्या मालकीची करण्यांत यावी, अशीहि कमिटीची सूचना आहे.

## श्री. ईश्वरन् ह्यांची लॉर्ड रे महाराष्ट्र औ. संग्रहालयास भेट

महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयास मुंबई सरकारच्या शेती व जंगल खात्याचे चिटणीस, श्री. ईश्वरन्, आय. सी. एस., यांनीं दिनांक १६ मे, १९५४ रोजीं भेट दिली. त्यांनीं कॉमनवेल्थ इमारतींतील व्यापारसंवर्धनगृह, व्यापारी नमुना प्रदर्शन, कला-कौशल्य विभाग, शेती व जंगल विभाग, औद्योगिक वाचनालय, मंडई मनोऱ्यावरील औद्योगिक विभाग, कर्वे रोड मार्केटची जागा, इ. पहाणी केली व संग्रहालयाबद्दल प्रशंसापूर्वक समाधान व्यक्त केलें.

## सांगली इंजिनिअरिंग कॉलेजला ग्रँट

भारत सरकारनें सांगली येथील न्यू इंजिनिअरिंग कॉलेजला इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल खातीं वाढविण्यासाठी १,५०,००० रुपयांची ग्रँट दिली आहे.

## इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजचा प्रयोग

ग्रेट ब्रिटनमधील सर्वांत मोठ्या औद्योगिक कंपनीनें तिच्या ७५,००० कामगारांना कंपनीचे भागीदार करण्याची योजना आखली आहे. कंपनीचें डिव्हिडंड ६% सुटलें तर प्रत्येक कामगाराला त्याच्या वार्षिक वेतनाइतक्या किंमतीचे भाग दिले जातील. डिव्हिडंडचा दर वाढला, तर कामगारांचे भागहि वाढतील. कंपनीच्या इतर २,५०,००० भागदारांप्रमाणें ह्या कामगार भागदारांचे अधिकार रहातील.

## दास बँक व दुर्गा बँक ह्यांना परवाना नाकारला

दास बँक लि. ला रिझर्व्ह बँकेनें परवाना नाकारला आहे. ह्याचा अर्थ, तिला आतां ठेवी स्वीकारता येणार नाहींत. ही बँक १९२९ मध्यें कलकत्ता येथें स्थापन झालेली असून तिचें वसूल भांडवल ८ लक्ष, ५५ हजार रु. व रिझर्व्ह २ लक्ष, २० हजार रु. आहेत. एकूण ठेवी सुमारें ८५ लक्ष रु. आहेत.

छिंदवाडा येथील दुर्गा बँक लि. वरहि असाच हुकूम बजावण्यांत आला आहे. ती बँक १९४४ मध्यें स्थापन झालेली असून वसूल भांडवल १ लक्ष, ४५ हजार रु., रिझर्व्ह २ हजार रु. व ठेवी ५ लक्ष ३७ हजार रु. असे आंकडे आहेत.

### रशिआंतील शास्त्रीय प्रगतीवर प्रकाश

आधुनिक भौतिक शास्त्राची प्रगति व वाढ प. युरोपांत प्रामुख्यानें झाली. तथापि ह्या शास्त्रांतील पहिली अवघड पावलें ओलांडल्यावर कोणत्याहि राष्ट्रानें एकदां टाकलीं कीं नंतरची प्रगति तें झपाट्यानें करूं शकतें. सध्यां शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग अणु व हैड्रोजन बॉंबसारखी सामुदायिक संहाराची हत्यारें तयार करण्याकडे होत आहे. अमेरिका हें राष्ट्र अशा हत्यारांच्या संख्येच्या बाबतींत रशिआपेक्षा पुष्कळ वरचढ असलें तरी दर्जाच्या बाबतींत तसें असेलच असें नाहीं; असा इषारा खुद्द अमेरिकन शास्त्रज्ञांनींच दिला आहे. सोव्हिएट रशिआच्या ह्या बाबतींतील प्रगतीसंबंधीं न्यूयॉर्क टाइम्सनें प्रसिद्ध केलेली वार्ता ह्या दृष्टीनें मननीय आहे. वार्ता पुढीलप्रमाणें आहे:— " गेल्या वर्षी ऑगस्टमध्यें रशिआनें जो स्फोट घडवून आणला त्यामुळें अमेरिकन तज्ज्ञांना सुद्धा आश्चर्य वाटलें आणि तेव्हांपासून रशिआची बरोबरी करण्याचे प्रयत्न जोरांत सुरू करण्यांत आले. अमेरिकेनें व ब्रिटननें ज्या कार्यपद्धतीनें अणुस्फोट घडवून आणला होता त्यापेक्षा रशिआची पद्धत वेगळी होती. ब्रिटनमध्यें अणुशास्त्रासंबंधीं हेरगिरी करण्याच्या आरोपावरून शिक्षा झालेला शास्त्रज्ञ जो क्लौस फुक्स ह्यानेंच ही पद्धति रशिआला सुचविली होती. हैड्रोजन बॉंबचा स्फोट घडवून आणण्यासाठीं अणुस्फोटाचा बत्तीसारखा उपयोग करण्याचें तंत्र अमेरिकेनें व ब्रिटननें वापरलें होतें. पण रशिआनें ह्याच कामासाठी एका रासायनिक प्रक्रियेचा उपयोग केला. ह्याशिवाय रशिआनें केलेल्या हैड्रोजनच्या स्फोटाचें आणखीहि एक वैशिष्ट्य आहे. ह्या स्फोटाचा जोर वाढविण्यासाठी रशिअन शास्त्रज्ञांनीं 'लिथिअम' ह्या हलक्या धातूचा उपयोग केला होता. ह्या सर्व अनपेक्षित पद्धतीमुळें ऑगस्ट १९५३ मध्यें रशिआनें घडवून आणलेला हैड्रोजन बॉंबचा स्फोट अमेरिकेनें १९५२ सालीं केलेल्या स्फोटापेक्षा अधिक जोराचा होता. रशिआची ही प्रगति लक्षांत घेऊनच अमेरिकन शास्त्रज्ञांनीं नवे प्रयोग केले आणि गेल्या एप्रिलमधील दोन स्फोट घडवून आणले.

**आसाममधील तेलाच्या विहिरी**—आसाम ऑईल कंपनीनें नहरकतिआ ह्या ठिकाणीं नव्या तेलाच्या खाणी शोधून काढल्या होत्या. ह्या नव्या खाणी दिगबोई येथील तेलाच्या उत्पादनाच्या केंद्राशीं एका नव्या रस्त्यानें जोडण्यांत आल्या आहेत. ह्या रस्त्यावर तेल वाहून नेणारे ११ मैल लांबीचे नळ घालण्याचें काम पूर्ण झालें आहे. नहरकतिया येथील खाणी गेल्याच महिन्यांत चालू झाल्या आहेत.

**उधारीनें वैमानिक प्रवास**—पॅन-अमेरिकन वर्ल्ड एअर लाइन्स ही कंपनी वैमानिक प्रवासाचें भाडें हप्त्यानें घेण्याची एक योजना येत्या १ मे पासून अंमलांत आणणार आहे, असें समजतें. अधिक प्रवाशांना प्रवास करतां यावा म्हणून ही योजना आंखण्यांत आली आहे. एकूण भाड्याच्या १० टक्के भाडे रोख घेण्यांत येणार असून बाकीचें २० महिन्यांत हप्त्याहप्त्यांनीं घेण्याची सोय करण्यांत येईल.

**टेलिव्हिजनचा परिणाम**—लंडनमधील बस सर्व्हिसच्या आणि भूमिगत रेल्वेच्या उत्पन्नांत गेल्या १४ महिन्यांत १२,५०,००० पौंडांची घट झाली आहे. टेलिव्हिजनवरील कार्यक्रम बघण्यासाठी इतके लोक घरींच राहूं लागले आहेत कीं त्यांच्या अनुपस्थितीमुळें प्रवाशांची संख्या खूपच रोडावली आहे. करमणुकीसाठी अगर भेटी-गांठींसाठी जाणारे लोकहि कमी झाले आहेत. त्यामुळें तिकिटांच्या दरांत वाढ होण्याचा संभव आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. १,९९,००० |
| ठेवी | रु. ७१,६८००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. — शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८१३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें